29

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

निवडणूक महत्वाचे

जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रक/जिल्हा-तालुका / निवडणूक कक्ष कामकाज./ /२०१८ 6384
दिनांक : /०७/२०१८ 20/7/2018

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४
३. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी निर्गमीत केलेली परिपत्रके/आदेश

## :- परिपत्रक :-

**विषय-जिल्हा व तालुका स्तरावर गठीत निवडणुक कक्षाचे कामकाज ठरविणे बाबत**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कब मध्ये झालेल्या दुरुस्ती प्रमाणे व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक ) नियम २०१४ मधील नियमानुसार संस्थांच्या निवडणुका घेतल्या जात आहेत. सदर निवडणुका या नियम ४ मध्ये सहकारी संस्थांच्या निवडणुकी प्रयोजनार्थ केलेल्या अ, ब , क व ड वर्गीकरणा अनुसार घेतल्या जातात. सदर निवडणुका घ्यावयाचे संस्थांची, तालुका व जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी स्तरावर संख्या जास्त असलेने व सदर संस्थांचे निवडणुक कामकाजाचे नियंत्रण नियमानुसार होणेस्तव त्यांचे सहाय्यतेसाठी तालुका व जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी कार्यालयात निवडणुक नियंत्रण कक्ष गठीत करुन त्यांचे मार्फत निवडणूक प्रक्रिया राबविली जात आहे. जिल्हा/ तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे साठी कक्षातील कर्मचारी/अधिकारी यांचे साठी अतिरिक्त मेहनताना अदा करणेचे परिपत्रक काढून प्रती संस्था प्रती कर्मचारी/ अधिकारी यांना मेहनताना ठरविण्यात आला असून त्या प्रमाणे क्षेत्रिय स्तरावर तो अदा केला जातो. मात्र क्षेत्रिय स्तरावरील निवडणूक कक्षाकडून आवश्यक माहिती व प्रस्तावित निवडणूक कार्यक्रमाची माहिती वेळेत व मुदतीत उपलब्ध होत नाही. तसेच क्षेत्रिय स्तरावर निवडणूक कक्षाचे काम फक्त प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे व निवडणूक कार्यक्रम मंजूर करणे एवढ्याच पुरते मर्यादीत झालेले दिसून येत आहे.

सबब राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे निवडणूकीच्या अनुषंगाने कामकाज वेळे वर ,अचूक आणि अद्ययावत होणेसाठी खालील प्रमाणे कक्षाने करावयाच्या कामकाजाबाबत या परिपत्रकान्वये निर्देश देत आहे.

| | |
|---|---|
| १ | निवडणुक नियम 5 नुसार कॅलेंडर वर्षात निवडणुकीस पात्र संस्थांचे ठेवावयाचे नमुना इ 1 मधील नोंदवही अद्ययावत करुन ती कॅलेंडर वर्षाचे अगोदर सहा महिने प्राधिकरणास सादर करणे |
| २ | दर वर्षी दि. ३१.०३ चा निवडणुक अपेंडिक्स विहीत नमुन्यात संस्था नावां सह सादर करणे |
| ३ | संस्थांची प्राथमिक मतदार यादी प्राप्त प्राप्त करुन घेणे, |
| ४ | प्राथमिक मतदार यादी ची तपासणी करणे |

| | |
|---|---|
| ५ | प्राथमिक मतदार यादी जिल्हा/तालुका निवडणुक अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार निवडणुक नियम व कायदा कानु प्रमाणे तयार करणे |
| ६ | प्राधिकरणाचे धोरणाप्रमाणे प्रारुप मतदार यादी अद्ययावतीकरण करून प्रारूप मतदार यादीच्या कार्यक्रमाची प्रसिद्द करणे |
| ७ | प्रारूप मतदार यादीवर आलेल्या हरकती संस्था निहाय तयार करुन जिल्हा/तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांचे समोर निर्णयास्तव सादर करणे |
| ८ | जिल्हा / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांनी दिलेले आदेशाप्रमाणे हरकती निकालात काढणे, |
| ९ | जिल्हा/तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांनी हरकतीवर दिलेला निर्णय संबधितांना नियमाप्रमाणे अवगत करणे, |
| १० | दिलेल्या मुदतीत परिपुर्ण अंतिम मतदार यादी प्रसिद्दी साठी जिल्हा /तालुका सह नि अधिकारी यांचेकडे सादर करणे |
| ११ | अंतिम मतदार यादी निवडणूक नियमाप्रमाणे विहित कार्यपद्दत्तीप्रमाणे प्रसिद्द केली असल्याचा अहवाल दाखल करून घेणे |
| १२ | प्राधिकरणाने मंजुरी दिलेले निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडुन विहित नमुन्यात निवडणुक कार्यक्रम प्राप्त करुन घेणे, |
| १३ | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कडुन प्राप्त प्रस्तावीत कार्यक्रमाची छाननी करुन जिल्हा/तालुका सह निवडणुक अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजुरीस्तव प्राधिकरणास सादर करणे, |
| १४ | प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या निवडणुक कार्यक्रमाची योग्य ती प्रस्रिध्दी देणे |
| १५ | प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे तो सुरु झाला किंवा नाही यांचा अहवाल घेणे |
| १६ | एकत्रित प्रसिद्दीचा अहवाल त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता पाठविणे |
| १७ | निवडणुक कार्यक्रम सुरु झालेले संस्थांचे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी अधिकारी / कर्मचारी यांची केंद्र निहाय नियुक्ती केलेची खात्रीकरुन अहवाल घेणे, |
| १८ | मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेतले किंवा नाही याचा अहवाल घेणे |
| १९ | उमेदवारी अर्ज माघारी नंतर प्रस्तावीत संस्थेची निवडणुक अविरोध झाली असलेस त्याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडुन नमुना इ 9 मध्ये अहवाल घेणे, |
| २० | माघारी नंतर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया होणारे संस्थेचे बाबत मतदानाचे आदले दिवशी संबधित केंदावर नियुक्त अधिकारी /कर्मचारी पोचलेचे व त्यांनी मतदान केंद्र उभारुन त्यांना वितरीत केलेले साहित्यांची पाहणी करुन ते बरोबर असल्याचा अहवाल घेणे, |
| २१ | मतदान केंद्रावर असलेले मतदानाच्या प्रमाणात मतपत्रिका असलेचा अहवाल घेणे, |
| २२ | मतदाना दिवशी निहित केलेले वेळेत मतदान प्रक्रिया सुरु झालेचा अहवाल प्राप्त करुन तो एकत्रित प्राधिकरणास पाठविणे |
| २३ | मतदान प्रक्रिया निर्धारीत वेळेत बंद झालेचा व झालेले मतदानाचा आकडेवारी संस्थानिहाय टक्केवारीनिशी प्राधिकरणास सादर करणे, |
| २४ | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडुन नुमना इ 17 मध्ये निवडणुकीचा अहवाल घेणे, |
| २५ | नमुना इ 17 प्रमाणे निवडून आलेले नवनिर्वाचीत सदस्यांची नावे तालुका / जिल्हा निवडणुक अधिका-या मार्फत प्रस्रिध्द करणे, |
| २६ | नव निर्वाचित सदस्यांमधुन पदाधिकारी निवडीची सभा नियमाप्रमाणे मुदतीत होणेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व संस्थेने नवनिर्वाचित सदस्यांची सभा बोलावली किंवा नाही याचा अहवाल घेणे, |

| | |
|---|---|
| २७ | निवडणुकीचे दिनांकापासुन १५ दिवसात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकी प्रित्यर्थ झालेला खर्चाचा प्रस्ताव जिल्हा /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर झाला किंवा नाही याची माहिती घेणे, खर्चाचा प्रस्ताव प्राप्त झाला नसल्यास तो प्राप्त करुन घेणे , |
| २८ | प्राप्त निधीचा प्रस्ताव प्राधिकरणाचे निर्देशाप्रमाणे आहे किंवा नाही याची खात्री करुन छाननी करणे, |
| २९ | मर्यादे पेक्षा जास्त निधीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाहणीसाठी सादर करणे, |
| ३० | निवडणुक प्रक्रिया पार पाडलेले संस्थेची नमुन १ ते ३१ नमुन्यातील माहिती संकलित करणे व त्याची माहिती प्राधिकरणास सादर करणे, |
| ३१ | संस्थेचा निधीचा हिशोब पुर्ण झालेनंतर त्या महिन्यात पुर्ण झालेले निवडणुकांची एकत्रित संस्थानिहाय माहिती प्राधिकरणास सादर करणे |
| ३२ | त्या त्या महिन्यात बिनविरोध निवडणूक झालेल्या संस्थांचा हिशोब तालुका /जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी पुर्ण करून,उर्वरीत शिल्लक रक्कम संस्थेस अदा करून केलेल्या कार्यवाहीचे प्रमाणपत्र प्राधिकरणास सादर करणे |
| ३३ | झालेल्या निवडणूकांचा दर महिन्याचे ५ तारखे पर्यंत विहित के लेल्या नमुन्यात मासिक प्रगती अहवाल सादर करणे |
| ३४ | सहकार न्यायालय व उच्च न्यायालय या मध्ये दाखल प्रकरणां बाबत प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यात माहिती सादर करणे |
| ३५ | निवडणूकीच्या अनुषंगिक प्राप्त तक्रारीवर निवडणूकी दरम्यान कारवाई होणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे प्राधिकरणाने तक्रारीच्या अनुषंगाने मागविलेली माहिती/अहवाल प्राधान्याने सादर करणे |
| ३६ | निवडणूकी खर्चाचे अनुषंगाने संस्थेचे ठेवावयाचे हिशोब प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यातील नोंदवह्यात दररोज नोंदी करणे |
| ३७ | उमेदवारांनी केलेल्या खर्चाची दैंनदीन माहिती प्राप्त करून घेवून तिचे संकलन करणे. मर्यादेपेक्षा ज्यादा केलेल्या खर्चा बाबत छाननी करून त्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करणे. |
| ३८ | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे अचार संहितेचे पालना बाबत कार्यवाही करणे, त्याची माहिती प्राधिकरणास देणे व आचार संहितेचे पालन झाले किंवा कसे याचा अहवाल घे |
| ३९ | प्राधिकरणाचे सुचना व निर्देशा प्रमाणे निवडणूका पार पाडलेल्या संस्थांचे दप्तर जतन करणे व तशी नोंदवही ठेवणे |
| ४० | प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार व सुचना नुसार कामकाज करणे |

प्राधिकरणाची क्षेत्रिय स्तरावर कोणतीही यंत्रणा नसलेने जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांचे स्तरावर त्यांचे अधिपत्या खालील अनुभवी व आवश्यक कर्मचारी /अधिकारी यांची निवडणूक कक्षासाठी नियुक्ती करून त्यांचे मार्फत प्रस्तावित निवडणूकांचे कामकाज पार पाडणेत यावे.

प्राधिकरणाचे निवडनूक कामकाजासाठी जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांचे स्तरावर गठीत केलेल्या निवडणूक कक्षास व जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांना यापुर्वी दिनांका २९.१०.२०१४, दिनांक १७.११.२०१४ , दिनांक ९.१२.२०१४ व तदनंतर १६.११.२०१६ आणि सद्यस्थितीत दिनांक १२.२.२०१८ व १६.३.२०१८ नुसार प्रती संस्था कसे

मानधन अदा करावयाचे याच्या सुचना दिलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही न केल्यास जबाबदारीची कार्यप्रणाली निश्चित केले आहे.

निवडणूक कक्षाचे अधिकारी/ कर्मचारी यांचे मानधन संबंधित संस्थांची संपुर्ण माहिती जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांना सादर करे पर्यंत अदा करू नये. त्याच प्रमाणे जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांनीही मानधन घेवू नये.

उपरोक्त पणे कामकाजाचा आढावा जिल्हा सहकारी निवडणुक आधिकारी / तालुका सहकारी निवडणुक आधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दरमहा त्यांचेस्तरावर घेवून त्याबाबतचा अहवाल दरमहाच्या १५ तारखेपर्यंत प्राधिकरणास सादर करावा. तालुका सहकारी निवड्णूक अधिकारी कार्यालयाचा दर तिमाहीचा (जुन,सप्टेंबर, डिसेंबर व मार्च) आढावा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालया मार्फत घेणेत यावा व त्याचा अहवाल प्राधिकरणास तिमाही नंतरच्या महिन्यातील शेवटच्या दिनांका पर्यंत सादर करावा. दर सहामाहीची आढावा प्राधिकरणा मार्फत घेणेत येईल.

वरील प्रमाणे परिपत्रकामधील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.

**मा.आयुक्त,राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण यांचे मान्यतेने व आदेशावरून**

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रती :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना**

१. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे